प्रकरण सहावे

# सारांश आणि निष्कर्ष

## अनुक्रमणिका


६.१ प्रस्तावना

६.२ संशोधनाचा प्रकरणनिहाय सारांश

६.३ संशोधनातील प्रमुख निष्कर्ष

## प्रकरण सहावे

# सारांश आणि निष्कर्ष

### ६.१ प्रस्तावना :

सत्यशोधक समाज 'तत्त्वप्रणाली, नेतृत्व आणि राजकीय प्रभाव' या अतिशय महत्त्वाच्या विषयावर प्रस्तुत संशोधकाने १९ व्या शतकापासूचा राजकीय, सामाजिक स्थित्यंतरांचा, प्रबोधनाचा आणि परिवर्तनाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला असून त्यातील अतिशय प्रमुख अशा क्रांतिकारी परिवर्तन घडवून आणणाऱ्या महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या कृतिशील विचार आणि कार्यातून साकार झालेले सत्यशोधक चळवळीचा आणि संघटनेच्या कार्यांचा, वाटचालीचा संशोधन पद्धतीने घेतलेला हा आढावा आहे, अभ्यास आहे. संघटनात्मक कार्यांचा असा अभ्यास यापूर्वी झालेला नाही म्हणून हा अभ्यास महत्त्वाचा असून आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण करणाऱ्या आणि समाजाला मानवतावादी मूल्यांची तसेच पुरोगामी विचारांची दिशा देणाऱ्या तसेच देशाच्या स्वातंत्र्य चळवळीवरही प्रभाव टाकणाऱ्या संघटनेवर हा अभ्यास आहे. संशोधकाने या विषयाची केलेली मांडणी संशोधकाच्या दृष्टिकोनातून झालेली आहे. या संदर्भातील आणखीन काही वेगळे पैलू पुढील काळातील संशोधक मांडू शकेल. पण हे संशोधन केल्यानंतर या चळवळीबद्दलचे निष्कर्ष अभ्यासातून जाणवलेल्या बाबी संशोधकाने पुढीलप्रमाणे मांडलेल्या आहेत.

या प्रबंध लेखनासाठी प्रकाशित, अप्रकाशित साधन सामुग्रीद्वारे व विचार प्रवाहाची दिशा यांचा सत्यशोधक समाजावर पडलेला प्रभाव, राजकीय जडणघडण त्यातून निर्माण झालेले नेतृत्व आणि तत्त्वप्रणाली यामुळे झालेली सामाजिक जडणघडण याचा विचार संस्थात्मक स्वरूपात आजपर्यंत फारसा झालेला नाही. तो करण्यासाठी या चळवळीच्या साधन सामुग्रीच्या आधारे प्रकाश टाकण्याचा, संस्थात्मक, संघटनात्मक दृष्टीने शोध घेण्याचा व अभ्यासण्याचा संशोधकाचा हा प्रयत्न आहे. तशा प्रकारचे प्रकाशित, अप्रकाशित, संग्रहित व स्वत: शोधून काढलेली विशेष स्वरूपाची सामुग्री, मुलाखती, प्रश्नावली, वृत्तपत्रीय कात्रणे आदींच्या माध्यमातून हा अभ्यास सुकर झाला आहे.

## ६.२ संशोधनाचा प्रकरणनिहाय सारांश :

महात्मा ज्योतिराव फुले आणि त्यांनी स्थापन केलेला 'सत्यशोधक समाज' याचे तत्त्वज्ञान, कार्य आणि त्यातून प्रेरणा घेऊन निर्माण झालेले नेतृत्व आणि त्याचा एकूणच महाराष्ट्रातील समाजावर झालेला दूरगामी परिणाम याचा शोध घेऊन त्याचे अहवाल लेखन एकूण पाच प्रकरणांच्या आधारे करण्यात आलेले आहे.

प्रास्ताविकापासून ते प्रबंधातील प्रकरणनिहाय योजना मांडून संशोधनकर्त्याने संशोधनाविषयीची प्रास्ताविक माहिती देऊन प्रबंध विषयाची निवड, संशोधनाची उद्दिष्टे संशोधन विषयाचे महत्त्व, संशोधन सामुग्री व संशोधन पद्धतीचा ऊहापोह केला आहे. सर्वसाधारणपणे प्रबंधाचा संकल्पित आराखडा खालीप्रमाणे विविध प्रकरणामध्ये वर्गीकृत करण्यात आला आहे.

१. प्रस्तावना – संशोधनाचा विषय, महत्त्व आणि उद्दिष्ट्ये

२. १९ वे शतक – महात्मा फुले आणि समाज प्रबोधन चळवळी

३. सत्यशोधक समाजाची तत्त्वप्रणाली, वाटचाल आणि कार्य

४. सत्यशोधक समाजाचे नेतृत्व आणि योगदान

५. सत्यशोधक समाजाचा राजकिय – सामाजिक प्रभाव

६. सारांश व निष्कर्ष

संदर्भसूची – परिशिष्टे – अ) मुलभूत साहित्य, अभिलेख, अहवाल वगैरे ब) प्रकाशित अप्रकाशित ग्रंथ व पुस्तके आणि माहिती क) महत्त्वाची वृत्तपत्रे, नियतकालिके, मासीके इ.

### १. प्रकरण पहिले - प्रस्तावना

संशाोधनाच्या प्रस्तावना या पहिल्या प्रकरणात प्रबंध विषयाचे महत्त्व, साधन सामुग्री अभ्यास पद्धती, उद्दिष्टे यांचा समावेश आहे.

१९ व्या शतकाच्या प्रारंभीची महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थिती ही मानवी जीवनाला नवे वळण देणारी ठरली. म्हणूनच महाराष्ट्रात घडून आलेल्या या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय परिवर्तनाचे दूरगामी परिणाम येथील समाजाच्या व समाजजिवनाच्या सर्वच अंगांवर झाले. त्यातून महाराष्ट्रात नव्या युगाची सुरुवात झाली. सत्यशोधक समाज व महात्मा फुल्यांचे महत्त्वपूर्ण कार्य, त्यांची समाजसुधारणेची भूमिका, तत्त्वे व तत्त्वज्ञानामागील भूमिका मांडली आहे. महात्मा ज्योतिराव फुले यांनी सुरू केलेली अनेक प्रकारच्या अन्यायाविरुद्ध समतावादी चळवळ ही या समाजाची शिकवण समाजाला

कशी प्रेरणादायी होती हे सांगून सत्यशोधक समाजाचे ध्येयधोरण त्याबरोबरच महात्मा फुले यांचा दृष्टिकोन या 'समाजाने' अखिल भारतीय पातळीवरील परिषदांच्या माध्यमातून केलेले कार्य, सत्यशोधक समाजाचा अन्य धर्मांवरील परिणाम यांचा स्थूल आढावा घेतला आहे.

## प्रकरण दुसरे - १९ वे शतक म. फुले आणि समाजप्रबोधन चळवळी :

महाराष्ट्रामध्ये १९ व्या शतकाच्या प्रारंभी समाजाच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक जीवनात नवे युग उदयास आले. या नव्या युगाने इथले समाजकारण, राजकारण, धर्मकारण, अर्थकारण ढवळून निघाले. समाजावर त्याचे वेगवेगळे परिणाम दिसू लागले. समाजास प्रेरक अशा नैतिक मूल्यांची निकोप वाढ होऊ लागली. ती राजाराम मोहन रॉय, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, महर्षि दयानंद सरस्वती, दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, लोकमान्य टिळक, महर्षि कर्वे, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, गोपाळ गणेश-आगरकर प्रा. गोपाळ गणेश गोखले, राजर्षि शाहू महाराज, महाराजा सयाजीराव गायकवाड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या धुरंधर नेतृत्वाची धुरा पाश्चात्य विचारांचा प्रभाव व ब्रिटिश राजवटीविरुध्द बोलण्याची ताकद हे १९ व्या शतकाचे खास वैशिष्ट्य म्हणावे लागेल. '१९ वे शतक, प्रबोधन चळवळी आणि सत्यशोधक समाजाची निर्मिती' ही या शतकाची फार मोठी देण म्हणावी लागेल. सदरील प्रकरणामधून महाराष्ट्राच्या इतिहासाची पार्श्वभूमी मांडून विविध स्थिती ही कशी घडली याचा आढावा घेतला आहे. यात महाराष्ट्राच्या उत्पत्तीचा इतिहास ते पाश्चात्य संस्कृतीचा उदय व विचार या अंगाने ऊहापोह केला.

१९ या शतकाच्या प्रारंभीच्या राजकीय परिस्थितीचा आढावा घेऊन समाजसुधारणांच्या चळवळी व समाजप्रबोधनाचे स्वरूप यावर प्रकाश टाकलेला आहे. या शतकातील धर्म सुधारणांविषयक चळवळी, परमहंस सभा, प्रार्थना समाज, आर्य समाज, ब्रम्होसमाज, सत्यशोधक समाज इत्यादींच्या निर्मितीमागची भूमिका स्पष्ट केली असून, तत्कालीन परिस्थितीत बहुजन समाजाच्या जागृतीसाठी या चळवळी कशा आवश्यक होत्या हा विचार संशोधनाच्या अंगाने मांडला आहे. महाराष्ट्राची शैक्षणिक सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय परिस्थिती आणि नेतृत्व याचा समाजावर झालेला परिणाम आणि महात्मा ज्योतिराव फुले यांची घडवून आणलेली क्रांती ही या शतकातील महत्त्वपूर्ण घटनांचा आलेख या प्रकरणाचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे.

एकंदरीत सर्व घटना-घडामोडींवर प्रकाश टाकणारी वृत्तपत्रे, नियतकालिके, साप्ताहिके यांचे योगदान सामाजिक जडण-घडणेसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण हजारो वर्षांपासून होत जाणारा

अन्याय दूर करण्यासाठी व बहुजन समाज जागृती करण्यासाठी वृत्तपत्रांची महत्त्वपूर्ण भूमिका महत्त्वाची मानलेली आहेत. सत्यशोधक विचारवंत व कार्यकर्त्यांनी केलेले कार्य, जनमानसात मिसळून, पदरमोड करून प्रचंड कार्य केले. त्यामुळेच नियतकालिके, वृत्तपत्रे चालू शकली, शाळा सुरू होऊ शकल्या, निराधार महिलांसाठी संस्था निर्माण होऊ शकल्या. विविध आंदोलने उभी राहू लागली होती. पाश्चात्य विचारांचे वारे या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचू शकले. म्हणून नियतकालिकांची वाटचाल, स्वरूप, भूमिका, त्यांनी केलेले समाजप्रबोधन, दिलेले योगदान, राबविलेले उपक्रम आदी महत्त्वपूर्ण बाबी चांगल्या पध्दतीने मांडल्या आहेत. महाराष्ट्रातील समाज प्रबोधनामध्ये ब्राह्मो समाज, आर्य समाज, प्रार्थना समाज आणि सत्यशोधक समाज यांचे कार्य व इतर समाजाची तत्त्वप्रणाली यापेक्षा सत्यशोधक समाजाची तत्त्वप्रणाली कशी वेगळी आहे आणि त्यातून सामाजिक क्रांती कशी झाली. अस्पृश्योद्धार, विधवांचे पुनर्विवाह, स्त्री शिक्षण, शेतकरी, शेतमजुरांचे प्रश्न, स्वातंत्र्य, समता, बंधुता आदी मूल्यांचा प्रसार हे महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक समाज चळवळीचे फार मोठे योगदान आहे. म्हणूनच एकोणिसाव्या शतकातील भारतातील समाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मीक आणि राजकीय क्रांतीचे ते अग्रदूत आहेत हे या प्रकरणातून सिध्द होते.

### प्रकरण तिसरे - सत्यशोधक समाजाची तत्त्वप्रणाली, वाटचाल आणि कार्य :

सत्यशोधक समाज निर्मितीची वाटचाल या प्रकरणामधून सत्यशोधक समाज निर्मिती पूर्वीचा इतिहास, तत्कालीन समाज व्यवस्थेचा इतिहास, तत्कालीन सामाजिक, राजकीय, धार्मिक नेतृत्व, सत्यशोधकांची पार्श्वभूमी व वारकरी संप्रदायाच्या पाऊलखुणा, इंग्रजी राजवटीचा समाजावर झालेला परिणाम याचा वेध घेतला आहे. सत्यशोधक समाजाच्या तत्त्वज्ञानाची चिकित्सा, महात्मा फुले यांची यामागील भूमिका, सत्यशोधक समाजाची स्थापना झाल्यानंतर राजकीय नेतृत्व, तत्कालीन समाजाची आर्थिक परिस्थिती व समाजाचे नेतृत्व, शैक्षणिक विचार व समाजाची वाटचाल याचा स्थूलपणे आढावा घेतला आहे. या बरोबरच सत्यशोधक समाजाचे साहित्य, सांस्कृतिक नेतृत्व, तत्त्वमीमांसा, धर्मचिकित्सा, चळवळीची साधने, प्रचार-प्रसारक, प्रबोधनात्मक आणि साहित्याची भूमिका हा भाग या प्रकरणाची मध्यवर्ती संकल्पना आहे. या सर्व बाबींसाठी नियतकालिकांचा सहभाग, चळवळी कशा उभ्या कराव्यात या विषयी फुले यांनी मांडलेले मत आणि लोकप्रबोधनातून सामाजिक, राजकीय, नेतृत्व कसे निर्माण होते याचाही विचार झालेला आहे. सत्यशोधक साहित्य, परिषदा, संमेलने, अधिवेशने यांद्वारे आशयसूत्र, पार्श्वभूमी आणि कार्य या विषयी विचार मांडून सत्यशोधक साहित्य परिषदेची निर्मिती व वाटचाल याचा

स्थूल परिचय या प्रकरणामधून करण्यात आला आहे. एकंदरीत सत्यशोधक समाजाच्या निर्मिती– वाटचालीत महात्मा ज्योतिराव फुले यांच्या दृष्टीने विचार मांडत, सदरील विषय हा सत्यशोधक समाजाच्या नेतृत्वाची धुरा महात्मा फुले यांच्यावरच असल्याचे दिसून येते. महात्मा फुल्यांनंतर त्यांच्या क्रांतिकारी विचारांतूनच समाज सुधारकांची एक प्रभावी पिढीच निर्माण झाली. पुढल्या शतकावर आणि आजही त्यांचाच प्रभाव जाणवतो.

## प्रकरण चौथे - सत्यशोधक समाजाचे नेतृत्व आणि योगदान :

महाराष्ट्रामध्ये सामाजिक जडणघडणीत सत्यशोधक चळवळींच्या माध्यमांतून झालेले कार्य आणि या चळवळीला लाभलेले नेतृत्व यांचाही स्थूल परिचय प्रकरण चारमध्ये घेतला आहे. संशोधनाच्या दृष्टीने सदरील प्रकरणात सत्यशोधक समाज स्थापनेपूर्वीचा इतिहास सांगून सत्यशोधक समाजाची पार्श्वभूमी, वाटचाल, समाजाचे कार्य व या समाजाचे अंतस्थ प्रवाह, त्यामध्ये ब्राह्मण प्रवाह, अब्राह्मण प्रवाह, तटस्थ प्रवाह यांचाही विचार मांडला आहे. सत्यशोधक समाजाच्या नेतृत्वातून झालेला बहुजन समाजाचा उध्दार, नंतर ब्रिटिशांचे सहकार्य त्यातून आलेला सुधारणावादी दृष्टिकोन यांचा उलगडा या प्रकरणाचा मूळ गाभा आहे. दुसरा महत्वपूर्ण भाग म्हणजे सत्यशोधक समाजाचे स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर समकालीन कालखंडानुसार अभ्यास व त्याचा समाजावरील परिणामांचीही चर्चा संशोधनकर्त्याने केली आहे. या समाजाने आजपर्यंत केलेली सामाजिक क्रांती व या चळवळीविषयी महात्मा फुले यांचे नेतृत्व कसे उपयुक्त ठरले याचा महत्त्वपूर्ण विचार मांडला आहे. त्यातून समाजाला जे योगदान मिळाले हे ओघाने या प्रकरणातून आले आहे.

## प्रकरण पाचवे - सत्यशोधक समाजाचा राजकीय आणि सामाजिक प्रभाव :

महात्मा फुले आणि त्यांच्या सत्यशोधक समाज या चळवळीचा प्रभाव हा त्यांच्या कालखंडापासूनच पडलेला दिसून येतो. १८८५ मध्ये राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना झाल्यापासून ते स्वातंत्र्य मिळेपर्यंत आणि स्वातंत्र्यानंतर जी राज्यघटना तयार करण्यात आली. त्यामध्येही महात्मा फुल्यांच्या विचारांचे प्रतिबिंब आपणास पाहावयास मिळते. महात्मा फुल्यांनंतर झालेल्या महाराष्ट्रातील सर्व प्रकारच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय अशा सर्व चळवळींवर आणि शासनाने आखलेल्या विकास कार्यक्रमांवर तसेच राजकीय, सामाजिक नेत्यावर त्यांचाच प्रभाव पडला असल्याचे दिसून येते. महात्मा फुल्यांचे समकालीन समाजसुधारक आणि त्यानंतरचे सर्व समाजसुधारक यांच्यावर महात्मा फुले यांच्याच विचारांचा प्रभाव पडलेला आहे.

स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रात आणि देशात महात्मा फुल्यांचे विचार आणि त्यांच्या कार्याला अतिशय महत्त्व प्राप्त झाले. सर्वच राजकीय पक्षांनी महात्मा फुल्यांना आदर्श स्थानी मानून आपल्या कार्याची प्रेरणा मानले. नव्या महाराष्ट्र राज्यात महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या तीन महान समाजसुधारकांना सर्वांनीच आपल्या प्रेरणा मानलेल्या आहेत. म्हणूनच महाराष्ट्र राज्याच्या नव्या विधान भवनासमोर महात्मा फुल्यांचा भव्य पुतळा उभारण्यात आलेला आहे. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या नावाने अनेक शासकीय योजना, कार्यक्रम होत आहेत. समाजामध्ये तर अनेक सार्वजनिक संस्थांना त्यांची नावे दिलेली आहेत. महाराष्ट्रातील बहुतेक शहरांमध्ये त्यांचे भव्य पुतळे उभारलेले आहेत. सारांशाने राजकारणासोबत महाराष्ट्राच्या समाज जीवनाच्या विविध क्षेत्रांत त्यांच्या विचार आणि कार्याचा खूप खोलवर रुजलेला आहे. हे सरकार आणि समाजाच्या प्रागतिक विचारांचे प्रतिक म्हणता येईल. असे विस्तृत विवेचन या प्रकरणात संशोधकाने केलेले आहे.

## सारांश :

संशोधनातील साधणे आणि निष्कर्षाच्या अखेरच्या प्रकरणामध्ये महात्मा फुले यांनी स्थापन केलेल्या ''सत्यशोधक समाज : तत्त्वप्रणाली नेतृत्व आणि राजकीय प्रभाव'' या संशोधन विषयाच्या अंगाने प्रकाश टाकला असून महात्मा फुलेकालीन समाजावर असलेल्या ब्राह्मण वर्गाचा पगडा, समाजात निर्माण झालेल्या जातिभेदांची तेढ व धर्मभोळेपणा, अंधश्रध्दा, कर्मकांड यात अडकलेला सर्वसामान्य माणूस यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी महात्मा ज्योतिराव फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. बहुजन वर्गाला सन्मानाच्या प्रवाहात आणण्यासाठीचा तो एक प्रयत्न होता. पाश्चात्य विचाराने भारावलेल्या महात्मा फुलेकालीन पिढीने म्हणूनच विविध प्रश्नांच्या अंगाने समजाकार्यांची धुरा सांभाळलेली दिसते. स्त्री–पुरुष समानता, स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आदी मूल्यांचा अंगीकार करून घडवून आणलेली ही क्रांती आणि या क्रांतीसाठी झटणारे महात्मा ज्योतिराव फुले यांचा सहकारी वर्ग हा महाराष्ट्राच्या समाज जीवनातील अत्यंत महत्त्वाचा घटक मानल्या जातो. अशा या धुरंधर क्रांतिकारकाच्या नेतृत्वातून निर्माण झालेली समाज बांधणीची ही चळवळ महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांमध्ये आणि काना–कोपऱ्यांपर्यंत पोहोचली होती. या चळवळीच्या आजही विविध ठिकाणी परिषदा, चर्चासत्रे, अधिवेशने तसेच सत्यशोधकीय साहित्य संमेलने भरत असतात. जनजागृती हा या चळवळीचा आत्मा असून आजही मोठ्या प्रमाणात त्यांचे कार्य सुरू आहे. त्यातून घडून येणारे समाजपरिवर्तन ही एक वैचारिक क्रांती म्हणावी लागेल. त्यातून निर्माण होणारे नेतृत्व हे बहुजनांचे म्हणावे लागेल. याचा एकंदरीत 'सत्यशोधक समाज, तत्त्वप्रणाली, नेतृत्व आणि

राजकीय प्रभाव' या विषयानुषंगाने प्रबंध विषय निवडीपासून ते उपसंहारापर्यंतचा तपशील, अशा घटना, घडामोडींचा स्थूल अभ्यास संशोधकाने केला आहे. त्यात सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, साहित्यविषयक वृत्तपत्रीय लेखन व इतर साधनसामुग्री आदींचा विविध अंगाने ऊहापोह केला आहे.

प्रस्तुत संशोधनकर्त्यांने १९ व्या शतकातील सत्यशोधक समाज व महात्मा फुले यांनी समाजाला दिलेला विचार, केलेली क्रांती याचा शोध घेतला आहे. या व अशा सर्व अभ्यासानंतर या विषयाच्या अनुषंगाने निष्कर्षांची नोंद करीत मूल्यमापनाकडे वळणे आवश्यक आहे. या सर्वस्पर्शी अभ्यासातून हाती आलेली निरीक्षणे नम्रपणे येथे नोंदवीत आहे.

सदर प्रबंधाद्वारे सत्यशोधक समाज व या समाजाने घडविलेल्या घटना व चळवळी इत्यादींचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. हा प्रबंध लिहीत असताना माझ्यासमोर जे जे प्रश्न उपस्थित झाले, ज्याचा ज्याचा उलगडा मला झाला ते ते इथे 'सत्यशोधक समाज, तत्त्वप्रणाली, नेतृत्व आणि राजकीय प्रभाव' या शिर्षकाच्या प्रबंधामध्ये कमी-अधिक प्रमाणात मी मांडण्याचा प्रयत्न केला असून, प्रत्येकाच्या मनोधर्मानुसार, विचारांनुसार त्यात बदल होऊ शकतो. कमी अधिकपणा जाणवू शकतो याची मला जाणीव आहे. त्याचा मी मनापासून आदर करतो.

## ६.३ संशोधनातील प्रमुख निष्कर्ष :

या विषयाच्या सर्वकष अभ्यासातून सदरच्या संशोधक विद्यार्थ्यांच्या हाती पुढील काही निष्कर्ष प्राप्त झालेले आहेत. सदरचे निष्कर्ष संशोधक विद्यार्थ्यांने कष्टपूर्वक केलेले प्रयत्न, महात्मा फुले व समकालीन सत्यशोधक समाज सुधारक, सुधारणावादी विचारवंत त्यांचे उपलब्ध साहित्य व त्यांचे विचारवंत इत्यादींच्या सखोल अभ्यासाचा, चिंतनाचा परिपाक आहे.

## संशोधनातील निष्कर्ष :

१) महात्मा फुलेकालीन बहुजन समाज, जीवनाची चाललेली पिळवणूक महात्मा फुल्यांनी जवळून अनुभवली व त्यांच्या विचारांना त्यातून चालना मिळाली.

२) सभोवताली घडणाऱ्या घटनांचा, त्यांच्या मनावर विपरीत परिणाम झाला. त्यातून समाज जागृतीसाठी काही तरी केलं पाहिजे म्हणून त्यांनी पावले उचलली.

३) सत्यशोधक समाजाच्या स्थापनेतून समाजाला स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुभाव त्याबद्दल आधुनिक विचार देण्याचा प्रयत्न झाला.

४) सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून तत्कालीन राजकीय, सामाजिक विचारांवर व व्यवस्थेवर तसेच नेतृत्वावर दूरगामी परिणाम झाले.

५) ब्रिटिशांनाही या माध्यमातून सडेतोड उत्तर देऊन सुधारणा करण्यास भाग पाडले.

६) नव्या शिक्षणविषयक विचारांचा प्रवाह सुरू झाला.

७) स्त्री सुधारणांसाठी पावले उचलून स्त्री विकासाची चळवळ उभी केली.

८) विधवा, परित्यक्तांच्या विकास कार्यक्रम हाती घेतला व बालविवाह केशवपन आदी कालबाह्य प्रथांच्या निर्मूलनाचा कार्यक्रम हाती घेतला गेला.

९) शेतकऱ्यांच्या हितांचे प्रश्न हाताळले गेले.

१०) शेतमजूर, दलित, शोषित, उपेक्षित समाजाला जागृत केले.

११) अस्पृश्यता निर्मूलनातून भेदाभेद–अमंगळ ही भूमिका उद्यास आली.

१२) खेड्यांतील माणसे, त्यांचे जीवन त्यांच्यावर असलेला ब्राह्मणशाहीचा पडलेला पगडा याला छेद दिला गेला.

१३) पाश्चात्य विचाराने प्रेरित होऊन आधुनिक जगात काय चाललेय याचे दर्शन प्रबोधन, कीर्तने, व्याख्याने, नियतकालिके आदी चळवळींच्या माध्यमातून समाज जागृती झाली.

१४) ग्रामीण जीवनातील विविध अनुभव सूक्ष्म आणि अनेक पदरी स्वरूपात हाताळणारे नव्या दमाचे लेखक, संपादक व समाज कार्यकर्ते म्हणून उदयास आले.

१५) भारतातील आधुनिक सामाजिक क्रांतीचे जनक म्हणून महात्मा फुले यांच्या कार्यांचा गौरव आता सर्वमान्य झाला आहे.

१६) सार्वजनिक सत्यधर्म, शेतकऱ्यांचा आसूड, अखंड, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पोवाड्यासारखी प्रभावी रचना करून शेतकरी, शेतमजूर, कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडणारे प्रथम लेखक म्हणून महात्मा फुल्यांचा उल्लेख करावा लागतो.

१७) दिशाहीन समाजाला जागृत करून नवनेतृत्व देण्याची गरज होती. ती गरज महात्मा फुल्यांच्या रूपाने समाजाला लाभली होती. त्यातूनच विविध क्षेत्रांतील पुरोगामी नेतृत्व निर्माण होऊ शकले.

१८) उच्चवर्णीय ब्राह्मण वर्गाचे प्रस्थ मोडीत काढून तळागाळातील उपेक्षित समाजाचा विकास करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करून सामाजिक न्याय प्रस्थापित केला

१९) आज दिसणारी सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रात झालेली प्रगती ही महात्मा फुले यांची देण आहे.

२०) अ. भा. सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून अधिवेशने, परिषदा, संमेलने आदींतून घडून येणारे समाजपरिवर्तन हे महात्मा फुले यांच्या विचारांचे फलित आहे.

२१) महात्मा फुले व तत्कालीन समाजसुधारकांनी अंगीकारलेले विचारप्रवाह हे सामाजिक बांधणीत महत्त्वपूर्ण होते. म्हणून विविध प्रकारच्या हालअपेष्टा सहन करणारा समाजही त्यांच्या विचारांनी भारावला व चळवळीत सहभागी झाला.

२२) 'दीनबंधूपासून' सुरु झालेली वृत्तपत्रीय जनजागृत्ती विविध नियतकालिकांच्या माध्यमातून स्वत:ची पदरमोड करून खेड्यापाड्यांत पोहोचवून केलेले समाज प्रबोधन ही तत्कालीन समाज नांदी होती ती प्रथम महात्मा फुल्यांनी सुरू केली. या चळवळीतूनच सत्यशोधकीय पत्रकारितेचा उगम व विकास झाला.

२३) रक्षण करणारेच भक्षण करणारा तो काळ होता. एका बाजूस पाश्चात्यीकरण आणि दुसऱ्या बाजूस बुरसटलेल्या समाजात अंधश्रध्दा, उचभ्रू समाजाचा पगडा, अन्याय अशा मूल्यहीन समाज व्यवस्थेत स्वत:ची काही जीवनमूल्ये जोपासणाऱ्यांना एका अटळ संघर्ष करावा लागत होता. शिवाय पेरून खाणारा उपाशी आणि मारून खाणारा तुपाशी अशी अवस्था होती. या सर्वांचा समाचार महात्मा फुल्यांनी घेतल्याचे दिसून येते. आज वर्तमान काळातही उच्च शिक्षितच शोषण करीत आहेत. म्हणून पुन्हा एकदा महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक चळवळीतूनच प्रेरणा घ्यावी लागेल.

२४) भारतीय समाज व्यवस्थेत शेतकरी हा एक घटक महत्त्वाचा आहे. परंतु इथली शेती व्यवस्था कधीच सुदृढ नव्हती. ती आजही नाही, तरीही काबाडकष्ट करणारा वर्ग ते करतोच आहे. शतक बदलले, औद्योगिकीकरणात झपाट्याने वाढ झाली. शेतकऱ्यांच्या नशिबी सतत दारिद्र्यच येत गेले. अशा दिशाहीन कष्टप्रद शेतकऱ्यांच्या वेदनांचा आक्रोश महात्मा ज्योतिराव फुले यांनी त्यांच्या साहित्यातून मांडला. आणि तीच त्यांच्या साहित्याची, नंतरच्या पिढीतील साहित्यिकांची प्रेरणा ठरली.

२५) महात्मा फुले आणि त्यांचे सहकारी प्रामुख्याने नारायण मेघाजी लोखंडे, कृष्णराव भालेकर, मुकुंदराव पाटील, भगवंतराव पालेकर, दिनकरराव जवळकर, श्यामराव देसाई, श्रीपतराव शिंदे, खंडेराव बागल, माधवराव बागल, केशवराव जेधे, केशवराव विचारे, केशव सीताराम ठाकरे, विश्वनाथ बाबळे व सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, तानुबाई बिर्जे आदींसारख्या सत्यशोधक कार्यकर्ते, विचारवंतांनी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत फिरून, शिरून ही चळवळ मोठी केली व समाजाला न्याय मिळवून दिला. ज्याची फळे आज आपण चाखत आहोत.

२६) म. फुल्यांनंतर ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर असा संघर्ष सुरू झाला. जहालमतवादी सत्यशोधक नेते, कार्यकर्ते यांनी विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत ब्राह्मणेत्तर पक्षाद्वारे प्रभावी कार्य केले. पुढे हा पक्ष कॉंग्रेस पक्षात विलीन झाला, तर काही नेत्यांनी शेतकरी-कामगार पक्ष स्थापन केला. काही नेते साम्यवादी, समाजवादी आणि रिपब्लीकन पक्षात गेले. म. गांधींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य चळवळीत ही चळवळ विलीन झाली. सर्वच राजकीय पक्षांनी यातून प्रेरणा घेतल्या.

२७) सत्यशोधेक ब्राह्मणेत्तर चळवळीवर नव्याने संशोधन करण्याची प्रेरणा या संशोधनातून मिळू शकेल. या चळवळीचा अभ्यास महाराष्ट्राच्या बाहेर पडून केला पाहिजे आणि अशा अभ्यासाची गरज आहे. कारण सत्यशोधक चळवळ महाराष्ट्राच्या बाहेरही प्रसारित झालेली होती. पण त्यावर अद्याप सखोल अभ्यास झालेला नाही.

२८) सत्यशोधक ब्राह्मणेत्तर चळवळीचा सांधा राजकारणाशी जोडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कारण कोणतीही चळवळी राजकीय क्षेत्राच्या बाहेर नसते. राजकारणाचे चळवळीवर आणि चळवळीचे राजकारणावर अनुकूल / प्रतिकुल परिणाम होत असतात.

२९) स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुभाव या मुल्यांच्या चौकटीत सत्यशोधक ब्राह्मणेत्तर चळवळीचा विकास कसा झाला आणि त्याचे समाजावर कसे परिणाम झाले याचेही ऐतिहासीक आत्मभान याचा अभ्यास अधिक या संशोधनाद्वारे व्हावा, त्यास गती मिळावी.

३०) महात्मा फुले सत्यशोधक समता परिषद, मुस्लिम सत्यशोधक मंडळ, रा. ना. चव्हाण प्रतिष्ठान, विविध पुरोगामी विचारांच्या चळवळी, युवक आणि महिला चळवळी असे नवेनवे धुमारे सत्तरीच्या दशकानंतर निर्माण झाले. त्याचे पडसाद साहित्य क्षेत्रावरही झाले. त्याचा नव्या संदर्भात अभ्यास व्हावा.

३१) समकालीन – नव्या महाराष्ट्र राज्यात पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांपासून ते आजपर्यंतच्या सर्व प्रमुख राजकीय नेते, समाज कार्यकर्ते, लेखक, संशोधक, शिक्षण संस्था चालक, युवक व महिला चळवळी, मागासलेल्या जाती–जमाती, अल्पसंख्याक समाज अशा सर्वांवर म. फुले आणि त्यांच्या सत्यशोधक समाज या संस्थेचा खोलवर सुपरिणाम झालेला दिसून येतो.

या सर्व गोष्टींचा 'सत्यशोधक समाज, तत्त्वप्रणाली, नेतृत्व आणि राजकीय प्रभाव' या संशोधन विषयाच्या अंगाने विचार केला असता महात्मा फुले व त्यांचे सहकारी यांचे विचार, समाजिक, राजकीय, शैक्षणिक, जडण–घडणीत महात्मा फुल्यांची भूमिका, नेतृत्व आणि त्यांचे वेगळेपण याचेच दर्शन घडते. आणि याचा प्रभाव आजपर्यंत सर्व क्षेत्रांवर झालेला दिसून येतो व पुढील काळावरही त्यांच्या विचार व कार्यांचा प्रभाव राहील असे प्रबंधकर्त्याला वाटते. त्याचाच शोध–बोध अग्रक्रमाने या प्रबंधात घेण्यात आला आहे. त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न संशोधकाने आपल्या परीने केलेला आहे.

कुठलेही संशोधनाचे कार्य हे एक व्यापक आणि जिकिरीचे कार्य असते. विशेषत: सामाजिक शास्त्रांच्या संशोधनात, संशोधन पध्दतीत मतभिन्नता असते. प्रत्येक संशोधन कर्त्याचा एक स्वतंत्र दृष्टिकोन असतो. त्यामुळे या शास्त्रातील संशोधन हे विज्ञानशाखांतील संशोधनापेक्षा नेहमीच परिपूर्ण आणि अंतिम नसते. त्याला काळाच्या, विषयाच्या साधनांच्या मर्यादा असतात. म्हणून की केलेले संशोधन हे सामाजिक शास्त्रांच्या एका मर्यादित केलेले आहे. संशोधनाच्या साधनांची उपलब्धता आज मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे संशोधन कार्याला चांगली मदत होत आहे. पण आजही महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय गत इतिहासावर आणि कालखंडावर अधिक संशोधन होण्याची गरज आहे.

प्रस्तुत संशोधनकर्त्याने संशोधनाची जी गृहीतके मांडलेली होती त्या सर्व गृहीतकाप्रमाणे संशोधनाचे कार्य झालेले आहे. म्हणून गृहीतकाची फलनिष्पत्ती या संशोधनातून दिसून येते. या संशोधनामुळे महाराष्ट्राचा सामाजिक राजकीय आणि सांस्कृतिक प्रगतीचा इतिहास चांगल्या प्रकारे नोंदवला जाईल आणि तो वर्तमान आणि भविष्यकालीन पिढीसाठी मार्गदर्शक ठरेल. अशा संशोधनामध्ये काही उणीवा असू शकतात. त्या उणीवा पुढील काळातील संशोधक पूर्ण करतील. पण पुढच्या संशोधकांसाठी हे संशोधन निश्चितच उपयोगी ठरेल असे वाटते. समाजाच्या आणि देशाच्या एकात्मतेसाठी, पुरोगामी वाटचालीसाठी अशी संशोधने उपयुक्त ठरतात. हेच या संशोधनातून उमगलेले एक सत्य आहे.

* * *

## संदर्भ ग्रंथसूची (Bibeliography)

## 'सत्यशोधक समाज : तत्त्वप्रणाली, नेतृत्व आणि राजकीय प्रभाव'


१. आगलावे सरोज, ज्योतिराव फुले सामाजिक तत्त्वज्ञान, सुगावा प्रकाशन, ५६२, सदाशिव पेठ, पुणे–३०, प्रथम आवृत्ती, फेब्रुवारी २००३.

२. आढाव बाबा, संपादक, आम्ही पाहिलेले फुले, ज्योतिराव फुले समता प्रतिष्ठान प्रकाशन, १२१२, भवानी पेठ, पालखी विठोबा चौक, प्रथम आवृत्ती, १९८१.

३. औटी व्ही. बी./खांदवे बी. टी., सावित्री ज्योती, जीवन साथी, प्रकाशक – सत्यशोधक प्रकाशन, पारनेर, प्रथम आवृत्ती, नोव्हेंबर १९८९.

४. उगले जी. ए., महात्मा फुले – एक मुक्त चिंतन, कौशल्य प्रकाशन, एन–११, सी–२/२४/३, हडको, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, २८ नोव्हेंबर २०००.

५. उगले जी. ए., सत्यशोधक तुकाराम हनुमंत पिंजण, चिन्मय प्रकाशन, द्वारा सवनेकर, जिजामाता कॉलनी, पैठण गेटजवळ, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, २००२.

६. उगले जी. ए., सत्यशोधक समाज अधिवेशने चिंतन आणि चिंता, प्रकाशक – मराठवाडा सार्वजनिक सभा, १४, रायगड, दिशा नभांगण परिसर, संत तुकोबानगर, प्रबोधनकार ठाकरे मार्ग, एन–२, सिडको, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, २००६.

७. एरंडे अशोक, सत्यशोधक मुकुंदराव पाटील, स्मृती प्रकाशन, १, गंगा चेंबर्स, कोर्ट गल्ली, अहमदनगर, प्रथम आवृत्ती, १२ नोव्हेंबर १९९६.

८. एरंडे अशोक, संपादक, दीनमित्र निवडक अग्रलेख, प्रकाशक – दीनमित्रकार मुकुंदराव पाटील, स्मारक समिती, मु. पो. तरवडी, ता. नेवासा, जि. अहमदनगर, द्वितीय आवृत्ती, २६ जानेवारी १९९८.

९. कीर धनंजय, महात्मा ज्योतिराव फुले, प्रकाशक – रामदास भटकळ, पॉप्युलर प्रकाशन प्रा.लि., ३५, सी. पं. मालवीय मार्ग, ताडदेव, मुंबई–२४, चतुर्थ आवृत्ती, १९९२/१९९६.

१०. कीर धनंजय, महात्मा ज्योतिराव फुले – आमच्या समाजक्रांतीचे जनक, पॉप्युलर प्रकाशन, चतुर्थ आवृत्ती, १९९२.

११. कीर धनंजय, महात्मा ज्योतिराव फुले, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, चतुर्थ आवृत्ती, १९९२.

१२. कीर धनंजय, मालशे स. गं., संपादक, महात्मा फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट्र राज्य, साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, आवृत्ती, १९६९.

१३. कदम श्याम, महात्मा फुले आणि महाराष्ट्रातील राजकारण, चिन्मय प्रकाशन, प्लॉट क्र. ११, स्वातंत्र्य सैनिक कॉलनी, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, २००८.

१४. कटारे मोतीराम, क्रांतीबा फुले – चळवळ आणि तत्त्वज्ञान, सुगावा प्रकाशन, ५६२, सदाशिव पेठ, चित्रशाळा इमारत, पुणे, प्रथम आवृत्ती, मार्च २०००.

१५. कोत्तापल्ले नागनाथ, ज्योतिपर्व, स्वरूप प्रकाशन, अक्षर, ८५८, सह्याद्रीनगर, एन–५, सिडको, औरंगाबाद, २००२.

१६. कांबळे रामकृष्ण, महात्मा फुले आणि आधुनिक महाराष्ट्र, प्रकाशक – कैलास पब्लिकेशन्स्, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, जानेवारी २००९.

१७. केंदूरकर मा. पु., महात्मा फुले : जीवन आणि कार्य, भारतीय विचारसाधना प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, मार्च १९९०.

१८. कुंभार नागोराव/अनभुले आनंद, महाराष्ट्रातील समाजशास्त्रीय चिंतन, डॉ. द. ना. धनागरे यांच्या भाषणातील भाग, प्रकाशक – समाजशास्त्रीय परिषद, महात्मा बसवेश्वर कॉलेज, लातूर १९९९.

१९. कुंभार नागोराव, संपादक, सामाजिक चळवळी काल, आज आणि उद्या (प्रा. एस. एम. तांबोळी यांचा लेख), प्रबोधन प्रकाशन, लातूर, प्रथम आवृत्ती, १९९४.

२०. कुंभार नागोराव, संपादक, सामाजिक चळवळी, काल आज आणि उद्या, प्रकाशक – प्रबोधन प्रकाशन, 'आई', शिवनगर, सूतगिरणी मार्ग, लातूर, प्रथम आवृत्ती, डिसेंबर १९९४.

२१. खाडीलकर नीळकंठ, महात्मांचा महात्मा ज्योतिराव फुले, प्रकाशक – सरोज देसाई, रालाका प्रकाशन, ४/३२, एन.आय.जी. कॉलनी, डी.एन. नगर, अंधेरी (प.), प्रथम आवृत्ती, फेब्रुवारी १९८९.

२२. खैरनार दिलीप, प्रगत सामाजिक संशोधन पद्धती व सांख्यिकी, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती, फेब्रुवारी २००९.

२३. खराट संभाजी, महात्मा फुले आणि निर्मिक, प्रतिमा प्रकाशन, ९३६२, औदुंबर (प्रकाशन) अपार्टमेंट, सदाशिव पेठ, पुणे, प्रथम आवृत्ती, १५ जून १९९९.

२४. खेडेकर पुरुषोत्तम, भटोबाचा कर्दनकाळ, जिजाई प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, डिसेंबर २००३.

२५. गरुड अण्णासाहेब/सावंत बी. बी., महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद, १९९५.

२६. गाठाळ साहेबराव, आधुनिक भारताचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती, जुलै २०००.

२७. गाठाळ साहेबराव, महाराष्ट्राचे शिल्पकार शंकरराव मोरे, अप्रकाशित प्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, २०००.

२८. गोळे व. ह., महाराष्ट्राच्या जीवनातील स्थित्यंतरे आणि त्यांचा साहित्यावर व संस्कृतीवर झालेला परिणाम, न. चिं. केळकर स्मारक व्याख्यानमाला, कुलसचिव पंडित भवानीशंकर, पुणे विद्यापीठ, पुणे–६.

२९. गुंदेकर श्रीराम, महात्मा ज्योतिबा फुले – विचार आणि वाङ्मय, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९२.

३०. गुंदेकर श्रीराम, सत्यशोधकीय साहित्याचा इतिहास, सत्यशोधकीय साहित्य प्रकाशन, लातूर, प्रथम आवृत्ती – खंड पहिला, मे २०१०.

३१. गर्गे स. मा., संपादक, भारतीय समाजविज्ञान कोश, खंड–३, समाजविज्ञान मंडळ, पुणे, आवृत्ती पहिली, १८८९, पृष्ठ क्र. ३६८ ते ३७०.

३२. घोरपडे वामनराव, महाराष्ट्रातील बहुजन समाजवादाची मीमांसा, चोपडे अशोक, संपादक, कंडिड प्रकाशन, लक्ष्मीनगर, वर्धा, प्रथम आवृत्ती १९४८.

३३. चोपडे अशोक, विदर्भातील सत्यशोधकीय चळवळीचे साहित्य, कंडिड प्रकाशन, लक्ष्मीनगर, वर्धा, प्रथम आवृत्ती, २८–११–२००३.

३४. चव्हाण रमेश, संपादक, सत्यशोधकाची चिंतनिका, दलितमित्र रा. ना. चव्हाण यांचे निवडक लेख, प्रकाशक – अक्षर श्रद्धांजली, पुष्प–१२, पश्चिम नगरी, कोथरूड, पुणे, २००६.

३५. चव्हाण रमेश, संपादक, महात्मा फुले सत्यशोधक समाज व सामाजिक प्रबोधन, रा. ना. चव्हाण, अक्षर श्रद्धांजली पुष्प, प्रकाशक – रा. ना. चव्हाण, ७अ/६, पब्लिकनगर, कोथरूड, पुणे–२९, २००९.

३६. चव्हाण रमेश, संपादक, महात्मा फुले यांचा शोध व बोध, रा. ना. चव्हाण, प्रतिष्ठान अक्षर श्रद्धांजली, पुष्प–१०, कोथरूड, पुणे–२९, २००३.

३७. चव्हाण रमेश, संपादक, महात्मा फुले यांचे नवदर्शन, एक तौलनिक अभ्यास, रा. ना. चव्हाण, प्रकाशक – रा. ना. चव्हाण, प्रतिष्ठान, अक्षर श्रद्धांजली, पुष्प–१०, कोथरूड, पुणे–२९, प्रथम आवृत्ती, २००३ (एप्रिल).

३८. चव्हाण रमेश, संपादक, शककर्ते श्री राजा शिवछत्रपती, रा. ना. चव्हाण, अक्षर श्रद्धांजली प्रकाशन, ७/ए–६, पश्चिमनगरी, कोथरूड, पुणे–२९, प्रथम आवृत्ती, एप्रिल २००७.

३९. चव्हाण रमेश, संपादक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शोध व बोध, रा. ना. चव्हाण, प्रकाशक – अक्षर श्रद्धांजली, पुष्प–११, ७/ए–६, पश्चिमनगरी, कोथरूड, पुणे–२९, प्रथम आवृत्ती, एप्रिल २००५.

४०. चव्हाण रमेश, संपादक, महात्मा फुले सत्यशोधक समाज व सामाजिक प्रबोधन, रा. ना. चव्हाण, अक्षर श्रद्धांजली, पुष्प–१५, ७/ए–६, पश्चिमनगरी, कोथरूड, पुणे–२९, प्रथम आवृत्ती, २००९.

४१. चव्हाण रमेश, संपादक, महात्मा फुले यांचे नवदर्शन – एक तौलनिक अभ्यास, रा. ना. चव्हाण प्रतिष्ठान, अक्षर श्रद्धांजली, पुष्प–१४, कोथरूड, पुणे–१४, प्रथम आवृत्ती, एप्रिल २००८.

४२. चव्हाण रमेश, संपादक, शककर्ते श्री राजा शिवछत्रपती एक प्रेरक समाज प्रबोधक परिवर्तनकार, रा. ना. चव्हाण, अक्षर श्रद्धांजली, ७/ए–६, पश्चिमनगरी, कोथरूड, पुणे–२९, प्रथम आवृत्ती, एप्रिल २००७.

४३. चव्हाण वैशाली, संपादिका, प्रबोधन, समाज प्रबोधन व परिवर्तन – ऐतिहासिक चिंतन, रा. ना. चव्हाण, रा. ना. चव्हाण प्रतिष्ठान, अक्षर श्रद्धांजली, पुष्प–६, जी–२, वैभव अपार्टमेंट, टिळकनगर, अमरावती मार्ग, रविनगर चौकाजवळ, नागपूर, प्रथम आवृत्ती, एप्रिल १९९९.

४४. चौसाळकर अशोक, महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ, लोकवाङ्मयगृह, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९९०.

४५. चौधरी कि. का., संपादक, महाराष्ट्र भूमी व लोक, महाराष्ट्र राज्य गॅझेटियर महाराष्ट्र शासन, प्रकाशक – कार्यकारी संपादक व सचिव, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, सुधारित आवृत्ती, १९९६.

४६. चौधरी कि. का., संपादक, महाराष्ट्र भूमी व लोक, महाराष्ट्र राज्य गॅझेटियर महाराष्ट्र शासन, कार्यकारी संपादक व सचिव, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, सुधारित आवृत्ती, १९९६.

४७. चोपडे अशोक, विदर्भातील सत्यशोधक चळवळीचे साहित्य, कॅण्डिड प्रकाशन, लक्ष्मीनगर, वर्धा, प्रथम आवृत्ती, नोव्हेंबर २००३.

४८. जवारे विजय, सामाजिकशास्त्राची जीवनप्रणाली, अद्वैत प्रकाशन, अकोला, प्रथम आवृत्ती, २००४.

४९. जैमिनी शारदा भाऊराव, सत्यशोधक विचारसूत्र, मित्रा प्रकाशन, भगवंत कॉम्प्लेक्स, नाशिक मार्ग, नाशिक, प्रथम आवृत्ती, मे २००९.

५०. जोशी लक्ष्मणशास्त्री, ज्योती चरित्र (राष्ट्रीय चरित्रमाला), नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, नवी दिल्ली, सुधारित आवृत्ती, १९९९.

५१. जोशी महेश, सत्यशोधक समाजाचा इतिहास, प्रस्तावना खंड, प्रकाशक – महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मंत्रालय, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९८७.

५२. जोशी बी. आर., संपादक, डायमंड सामाजिक ज्ञानकोश, खंड–३, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २००७, पान क्र. २०२७ व २०२८.

५३. ठोके मो. नि., आधुनिक महाराष्ट्राचे उदगाते, पारख प्रकाशन, २१, चर्च स्ट्रीट, कॅम्प बेळगाव, प्रथम आवृत्ती, नोव्हेंबर १९८९.

५४. ठोके मो. नि., संपादक, रा. ना. चव्हाण निवडक वाङ्मय, प्रकाशक – पारख प्रकाशन, २१, चर्च स्ट्रीट, कॅम्प बेळगाव, प्रथम आवृत्ती, डिसेंबर १९९५.

५५. ढावरे रमेश, महात्मा फुल्यांचे विचार आणि कार्य, वस्तुस्थिती आणि विपर्यास, प्रकाशक – प्रशीक विद्यार्थी

५६. तळवलकर गोविंद, महात्मा फुले यांचा व्यक्तिस्वातंत्र्यवाद, महात्मा फुले, गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग प्रकाशन, प्रथम आवृत्ती, १९८२.

५७. तारकुंडे सीताराम रघुनाथ, ब्राह्मणेतर व मराठे यांच्या चळवळीचा पूर्वेतिहास आणि मराठ्यांची पूर्वपीठिका, प्रथम आवृत्ती, १९२२.

५८. दिघे प. श्री., वासाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड, भाषांतरित, गेल ऑमवेट, सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, प्रथम आवृत्ती, १९९५.

५९. देशपांडे स. ह., दलित मुक्तीची नवी दिशा, काही प्रयोग, महात्मा फुले, यार यान मास्ला, प्रकाशक, ग. म. राजर्षी कुलसचिव, मुंबई विद्यापीठ संघ, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, जानेवारी १९८९.

६०. देशमुख मा. म., राष्ट्रनिर्माते, प्रकाशक – शिवभारती प्रकाशन, ६९–ए, कोतवालनगर, नागपूर–२२, प्रथम आवृत्ती, १९८९.

६१. नाईकनवरे विश्वास, तिरपी टोपी ताठ मान – शंकरराव मोरे यांचे विचारविश्व, प्रकाशक – कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे, प्रथम आवृत्ती, २००६.

६२. नरके हरी, संपादक, फडके य. दि., महात्मा फुले गौरव ग्रंथ, खंड पहिला, प्रकाशक, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, द्वितीय आवृत्ती, नोव्हेंबर १९९१.

६३. नरके हरी/फडके य. दि., संपादक, महात्मा फुले गौरवग्रंथ, खंड दुसरा, प्रकाशक – महात्मा फुले चरित्रसाधने प्रकाशन, समिती महाराष्ट्र राज्य, शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई–३२, द्वितीय आवृत्ती.

६४. नरके हरी, संपादक, महात्मा फुले शोधाच्या नव्या वाटा, प्रकाशक – डॉ. आंबेडकर – म. फुले – राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, म. रा. मुंबई, प्रथम आवृत्ती, २००६.

६५. नरके हरी, संपादक, महात्मा फुले साहित्य आणि चळवळ.

६६. पोटदुखे सुखदेव बाबूराव, नामदेवांची कविता, प्रेरणा स्वरूप आणि वेगळेपण, स्वा. रा. ती. मराठवाडा विद्यापीठात पीएच्.डी.साठी सादर केलेला प्रबंध, २००७.

६७. पळशीकर वसंत, अनुवादक, गोपाळकृष्ण गोखले, ब्रिटिश राजवट व भारतीय नेमस्त युग, बलराम नंदा, प्रकाशक – विश्वकर्मा साहित्यालय, २०३५/२, टिळक पथ, सदाशिव पेठ, पुणे–३०, १९८६.

६८. पानतावणे गंगाधर, संपादक, लोकचळवळीचे प्रणेते महात्मा ज्योतिबा फुले, प्रकाशक – डॉ. बोरा, कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद (महात्मा फुले प्रतिष्ठान विभाग), प्रथम आवृत्ती, १९९७.

६९. पाटील व्ही. बी., महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, प्रकाशक – अनिलकुमार मेहता, अजब पुस्तकालय, भाऊसिंग मार्ग, कोल्हापूर, १९८६.

७०. पाटील शरद, फुले तत्त्वज्ञानी होते काय? नवभारतमधील लेख, एप्रिल १९८१.

७१. पाटील पंढरीनाथ सीताराम, महात्मा ज्योतिराव फुले, मनोविकार प्रकाशन, आमदार निवास, मंत्रालय, मुंबई, द्वितीय आवृत्ती, ऑगस्ट १९८९.

७२. पारकर अरविंद घनश्याम, महात्मा फुले : विचार आणि वारसा, संपादक, युनिक फीचर्स, पुणे, मनोविकास प्रकाशन, आमदार निवास आवार, मंत्रालयाशेजारी, चर्चगेट, मुंबई–३२, १९९१.

७३. फडके य. दि., संपादक, महात्मा फुले समग्र वाङ्मय, प्रकाशक – महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पाचवी आवृत्ती, १९९१.

७४. फडके य. दि., संपादक, ज्योतिराव फुले, गुलामगिरी, महात्मा फुले समग्र वाङ्मय, प्रकाशक – महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९१.

७५. फडके य. दि., संपादक, दिनकरराव जवळकर, समग्र वाङ्मय, प्रकाशक – महात्मा ज्योतिराव फुले समता प्रतिष्ठान, ७३, नानापेठ, पुणे–३०, प्रथम आवृत्ती, मे १९८४.

७६. फडके य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड–१, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९८९.

७७. फडके य. दि., व्यक्ती आणि विचार, प्रकाशक – श्रीविद्या प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९८५.

७८. फडके य. दि., महात्मा फुले समग्र वाङ्मय ग्रंथ सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक, म. रा. साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, पाचवी आवृत्ती, १९९१.

७९. बगाडे उमेश, महाराष्ट्रातील प्रबोधन आणि वर्गजाती अभुत्व, प्रकाशक – सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, जानेवारी २००६.

८०. बागल माधव खंडेराव, संपादक, सत्यशोधक हीरक महोत्सव ग्रंथ, १९३३, प्रकाशक – राष्ट्रीय संघटक, समता सैनिक डॉ. आंबेडकर कॉलनी, लष्करी बाग, नागपूर–१७, प्रथम आवृत्ती १९३३.

८१. बागल भाई माधवराव, सामाजिक विचारमंथन, आनंद प्रकाशन, जयसिंगपुरा, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, १९८१.

८२. बोरोडे नीळकंठ, ज्योतिराव फुल्यांचा सुधारणावाद, सुगावा प्रकाशन, ८६१/१, सदाशिव पेठ, पुणे–३०, प्रथम आवृत्ती, मे १९९४.

८३. भोळे भास्कर लक्ष्मण, महात्मा ज्योतिराव फुले, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, द्वितीय आवृती, २००६.

८४. भोळे भास्कर लक्ष्मण, महात्मा ज्योतिराव फुले भारतीय साहित्याचे निर्माते, प्रथम आवृत्ती, १९९६.

८५. भोळे भास्कर लक्ष्मण, महात्मा फुले वारसा आणि वसा, साकेत प्रकाशन, म. गांधीनगर, फायर ब्रिगेडमागे, रेल्वे स्टेशन मार्ग, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, १९९०.

८६. भवरे अशोक, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (१८१८–१९६०), प्रकाशक – कल्पना प्रकाशन, ६, एच.आय.जी. कॉलनी, आय.टी.आय.जवळ, नांदेड, प्रथम आवृत्ती, २००६.

८७. भवरे अशोक, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (१८१८ ते १९६०), कल्पना प्रकाशन, एच.आय.जी. कॉलनी, आय.टी.आय.जवळ, नांदेड, प्रथम आवृत्ती, २००६.

८८. भांडारकर पु. ल., सामाजिक संशोधन पद्धती, प्रकाशक – महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर, द्वितीय आवृत्ती, १९८१.

८९. भिडे–पाटील–थोरात, महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, प्रकाशक – फडके प्रकाशन, अथर्व अपार्टमेंट, प्लॉट क्र. १०, टीपीएस क्र.१७/२१७/७, दुधळी, कोल्हापूर–१२.

९०. भिडे विद्याधर वासुदेव, महात्मा फुल्यांच्या कार्यात ब्राह्मणांचा सहभाग, पुष्पक प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २००१.

९१. मोरे दिनेश, आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनांचा इतिहास, प्रकाशक – के.एस. पब्लिकेशन्स, द्वारा ६/४, वीर व्यंकटेश, वीर सावरकरनगर, माणिकबाग, सिंहगड मार्ग, पुणे–५१, प्रथम आवृत्ती, डिसेंबर २००६.

९२. मुक्त विद्या केंद्र, आधुनिक महाराष्ट्र १९ वे शतक, भाग–२, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे–३७, २००१.

९३. मुक्तविद्या केंद्र, १९ वे शतक, भाग–२, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे–३७.

९४. मुखर्जी आर. एन., सामाजिक विचारधारा, प्रकाशक – विवेक प्रकाशन, दिल्ली, १९९०.

९५. मंगुडकर मा. प., महाराष्ट्रातील विचार, प्रकाशक – गजानन बुक डेपो, पुणे, १९९०.

९६. मंगुडकर मा. पं., महात्मा फुले आणि सत्यशोधक चळवळ, प्रकाशक – गजानन बुक डेपो, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९६५.

९७. मंगुडकर मा. प., संपादक, महाराष्ट्रातील समाज प्रबोधन आणि समाज प्रबोधनाचे कार्य, प्रकाशक – ग. ज. अभ्यंकर, कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशा खिंड, पुणे–६, १९७५.

९८. माळी मा. गो., भारतीय कामगार चळवळीचे आद्य जनक, रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे, जे. पी. प्रकाशक – सौ. आशा मारुतीराव माळी, आशा प्रकाशन, गारगोटी, १९९०.

९९. माळी गजमल, संपादक, महात्मा ज्योतिबा फुले यांचे निवडक विचार, प्रकाशक – यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई–२१, प्रथम आवृत्ती, १९९०.

१००. माळी मा. गो., धन्य हा ज्योतिबा झाला, आशा प्रकाशन, गारगोटी, जि. कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, १९९०.

१०१. युनिक फीचर्स, महात्मा फुले विचार आणि वारसा, प्रकाशक – मनोविकास प्रकाशन, आमदार निवास, मंत्रालयाशेजारी, चर्चगेट, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९९१.

१०२. राऊत गणेश/राऊत जोशी, महाराष्ट्रातील परिवर्तनांचा इतिहास, डायमंड पब्लिकेशन, चतुर्थ आवृत्ती, डिसेंबर २००९.

१०३. रेगे मेघश्याम पुंडलिक, महात्मा फुले यांचा सार्वजनिक सत्यधर्म लेख, महात्मा फुले गौरवग्रंथ, महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, म.रा. शिक्षण विभाग, मुंबई, द्वितीय आवृत्ती, १९९१.

१०४. वैद्य प्रभाकर, महात्मा फुले आणि त्यांची परंपरा, लोकवाङ्मयगृह, मुंबई–४, प्रथम आवृती.

१०५. वडस्कर या. वा., महात्मा फुले ईश्वर व धर्मविषयक दृष्टिकोन, महात्मा फुले गौरवग्रंथ, १९८२.

१०६. शहा जी. बी./पाटील बी. एन., आधुनिक भारताचा इतिहास, प्रकाशक – प्रशाना पब्लिकेशन्स, १७, शॉपिंग स्टेडियम, सेंटर स्टेट बँकेसमोर, जळगाव, प्रथम आवृत्ती, २००८.

१०७. शिंदे अरुण, अभ्यासक, सत्यशोधक चळवळीच्या नियतकालिकांचा वाङ्मयीन अभ्यास (१८७७ ते १९३०), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पीएच्.डी. पदवीसाठी सादर केलेला प्रबंध, २००७.

१०८. सहस्त्रबुद्धे पु. ग., संपादक, लोकहितवादीची शतपत्रे, म. राज्य शिक्षण विभाग प्रकाशन, प्रथम आवृत्ती, १९९९.

१०९. सावंत उत्तम, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, प्रकाशक – निर्मल प्रकाशन, नरहर कुरुंदकर मार्ग, कैलासनगर, नांदेड, प्रथम आवृत्ती, २००५.

११०. सूर्यवंशी राजाराम, युगश्री सावित्रीबाई फुले, मावळाई प्रकाशन, शिरूर, जिल्हा पुणे, द्वितीय आवृत्ती, २००४.

१११. स्वामी व्ही. एन., महाराष्ट्रातील समाजसुधारक संत साहित्यिक आणि थोर भारतीय विचारवंत, प्रकाशक–विद्याभारती प्रकाशन, गीतांजली मार्केटजवळ, मेन रोड, लातूर, प्रथम आवृत्ती, २००५.

११२. सरदार गं. बा., संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती, प्रकाशक – श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे, चतुर्थ आवृत्ती, १९८२.

११३. सरदार गं. बा./जोशी दे. श्री./लोखंडे म. द., संपादक, महाराष्ट्र जीवन परंपरा, प्रगती आणि समस्या खंड, मेसर्स जोशी आणि लोखंडे प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे–२, १९६०.

११४. सरदार गं. बा., महात्मा फुले व्यक्तित्व आणि विचार, प्रकाशक – ग्रंथाली वाचक चळवळ, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९८८.

११५. सरदार गं. बा., महाराष्ट्रातील समाजप्रबोधनाची वाटचाल, नवनिर्माण प्रकाशन, पारगाव, ता. दौंड, जि. पुणे, प्रथम आवृत्ती.

११६. साळुंखे आ. ह., महात्मा फुले आणि धर्म, प्रकाशक – प्रकाश विश्वासराव, लोकवाङ्मयगृह, प्रभादेवी, मुंबई.

११७. संकपाळ बापूजी, संपादक, महात्मा फुले गौरवग्रंथ, गुलामगिरी तात्कालिक, ताखिक आणि सार्वजनिक स्वरूप विचार (लेख), प्रकाशक – पी. बी. साळुंके, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई–३३, प्रथम आवृत्ती, १९८२, पृष्ठ ४८३, ४४.

* * *

## नियतकालिके/मासिके/दैनिके/स्मरणिका

### ● मासिके ●

१. कुंभार नागोराव, संपादक, विचारशलाका, शाहू महाराज विशेषांक, वर्ष ५ वे, अंक २०, एप्रिल ते जून १९९२.

२. चैत्रवेल, संपादक, दिवाळी अंक, औरंगाबाद, १९८३.

३. महाराष्ट्र साहित्य पत्रिका, अंक २७४, जुलै ते सप्टेंबर, पुणे, १९९५.

४. लोकराज्य, सावित्रीबाई फुले विशेषांक, १ जानेवारी १९९६, गंधे दिवाकर, संपादक, अंक १७, वर्ष ५१ वे.

५. कोमटकर ज्योती, माळवी नूतन, चड्डे सुरेश, जमगडे विनायक, झाडे श्याम, वानखडे अरविंद, बहुजन संघर्ष सत्यशोधक विशेषांक, १९९५.

६. मार्क्सवाद व फुले-आंबेडकर वाद, शरद पाटील, लेख नवभारत, एप्रिल १९८०.

### ● स्मरणिका ●

१. सत्यशोधक साहित्य संमेलन, दुसरे अधिवेशन, अध्यक्षीय भाषण २५/२६ डिसेंबर, २००४.

२. सत्यशोधकीय साहित्य संमेलन, अध्यक्षीय भाषणे, संपादक, उगले जी. ए., मुंडे श्याम, टेकाळे विठ्ठल, वाघ प्राजक्ता, प्रकाशक - सत्यशोधकीय साहित्य आणि संशोधन परिषद, देऊळगाव राजा, प्रथम आवृत्ती.

३. अग्निफुले - स्मरणिका चौथे, सत्यशोधकीय साहित्य संमेलन, देऊळगाव राजा, २४/२५ डिसेंबर २००६, प्रकाशक - कार्यकारिणी अखिल भारतीय सत्यशोधक समाज, तालुका शाखा, देऊळगाव राजा, जि. बुलढाणा व स. सा. सं. आणि संशोधन परिषद, देऊळगाव राजा.

४. सत्यशोधकीय साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषणे, संपादक, उगले जी. ए./ मुळे श्याम / टेकाळे विठ्ठलराव, वाघ प्राजक्ता, प्रकाशक – सत्यशोधकीय साहित्य आणि संशोधन परिषद शाखा, देऊळगाव राजा, प्रथम आवृत्ती, २००७.

५. फाळके वसंत, संपादक, सहावे अखिल भारतीय साहित्य संमेलन, सातारा.

६. दुसरे सत्यशोधकीय साहित्य संमेलन, जालना, स्मरणिका, २५/२६ डिसेंबर २००४, संपादन समिती, ढवळे रावसाहेब, उगले जी. ए., मुंढे श्याम, गिऱ्हे, ढोकणे, कुमठेकर, यशवंत.

७. सत्यशोधकीय साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषणे, उगले जी. ए., मुंढे श्याम, टेकाळे विठ्ठलराव, वाघ प्राजक्ता, प्रकाशक – सत्यशोधकीय साहित्य संस्कृती आणि संशोधन परिषद, शाखा देऊळगाव राजा, प्रथम आवृत्ती, २००७.

८. सत्यशोधकीय साहित्य संमेलन, दुसरे अधिवेशन, २५/२६ डिसेंबर २००४, अध्यक्षीय भाषण.

९. सहावे अखिल भारतीय सत्यशोधकीय साहित्य संमेलन, २००९, फाळके वसंतराव, संपादक, प्रकाशक – अखिल भारतीय सत्यशोधक समाज, सातारा.

१०. इशारा, पहिले, सत्यशोधकीय साहित्य संमेलन, लातूर, २०/२१ डिसेंबर २००३, स्मरणिका.

११. दुसरे सत्यशोधकीय साहित्य संमेलन, जालना, २५/२६ डिसेंबर २००४, 'असूड' स्मरणिका संपादन समिती.

## ● दैनिके ●

१. विजयी मराठा, ९ एप्रिल १९२३.

२. विजयी मराठा, ९ एप्रिल १९२३.

३. बहुजन संघर्ष, सत्यशोधक विशेषांक, १९९५, संपादक – नागेश चौधरी.

४. केसरीतील लेख, भाग १ ला, टिळक बाळ गंगाधर, केसरी–मराठा संस्था, पुणे, प्रथम आवृत्ती, १९२२.

५. दीनमित्र, ७ जानेवारी, १९५३, वर्ष ४३, अंक १४.

## • त्रैमासिक •

१. आढाव बाबा, पुरोगामी सत्यशोधक त्रैमासिक, वर्ष २८, अंक २, एप्रिल–मे–जून २००२.

## • प्रासंगिक पत्रक •

१. महात्मा फुले पाणलोट पथक परिपत्रक, प्रकाशक – राष्ट्र सेवादल, साने गुरुजी स्मारक, पुणे, १९९०.

## • संघटन-जाहीरनामा पुस्तिका •

१. अखिल भारतीय सत्यशोधक समाज, औरंगाबाद, जाहीरनामा, कार्यालय –शिल्पवर्धन, खडकेश्वर, औरंगाबाद, अध्यक्ष – रायभान जाधव.

## • नियतकालिक •

१. महात्मा फुले व्याख्यानमाला, दंडवते मधू (व्याख्याने), वर्ष २, १९८७–८८, प्रकाशक – ग. म. राजर्षी, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई.


* * *